Exh.01

अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडीशिअल मॅजिस्ट्रेट साहेब,
यांचे कोर्टात

एस.टी.सी. नंबर
2393 /२०२५

फिर्यादी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामिण बिगरशेती
सहकारी पतसंस्था मर्यादित सावेडी,
कुशाबा नगर, भिस्तबाग , अहमदनगर.
करिता अधिकृत प्रतिनिधी
**सौ. चंद्रकला मधुकर भांड**
वय –३८ वर्षे, धंदा – नोकरी
रा. मु. पो. गजराज फॅक्टरी समोर,
भिस्तबाग, अहमदनगर.
मो. नं.८६६८९१८७२६.

आरोपी

मयुरी सागर शिंदे
वय– ३० वर्षे धंदा– व्यवसाय
रा. २५७, समर्थ शाळेजवळ,
सांगळे गल्ली, अहमदनगर.
मो. नं. ९९६०९६५८५८

गुन्हा – निगोसिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार
या कामी फिर्यादी कळवितात ते खालील प्रमाणे

Scanned with CamScanner

<u>परिशिष्ट</u>

| | | |
|---|---|---|
| १. | चेक देणा-याचे नांव | मयुरी सागर शिंदे |
| २. | चेक नंबर व तारीख | चेक नंबर १३६३१२<br>ता. २०/०१/२०२५ |
| ३. | चेकची रक्कम | रुपये ३,०२,८७९/- |
| ४. | चेक कोणत्या बँकेवरील आहे | ॲक्सीस बँक लि. शाखा, सावेडी, अहमदनगर |
| ५. | चेक भरल्याची तारीख | २०/०१/२०२५ |
| ६. | चेक परत आल्याची तारीख | २२/०१/२०२५ |
| ७. | चेक परत आल्याचे कारण | " फन्डस इन सफिशिअन्ट " |
| ८. | नोटीस पाठविल्याची तारीख | २५/०१/२०२५ |
| ९. | नोटीस स्विकारल्याची तारीख | २९/०१/२०२५ |
| १०. | कोणत्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुन्हा घडला | तोफखाना पोलीस स्टेशन , अहमदनगर |
| ११. | गुन्हा घडल्याचे कारण | दि.२२/०१/२०२५रोजी चेक न वटता परत आला व तदनंतर आरोपीस दि. २५/०१/२०२५ रोजी नोटीस पाठवुनही आरोपीने फिर्यादीस मुदतीत चेकची रक्कम आणुन दिली नाही. |

१] फिर्यादी पुण्यश्लोक आहिल्यादेवी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, सावेडी, कुशाबा नगर, भिस्तबाग, अहमदनगर ही महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अन्वये स्थापन झालेली सहकारी पतसंस्था असुन तीचा कारभार सहकारी कायदयानुसार

Scanned with CamScanner

तसेच फिर्यादी संस्थेचे पोटनियमानुसार चालतो. फिर्यादी संस्थेचे वतीने फिर्यादी दाखल करणे, त्यावर सहया करणे, जवाब देणे, व्हेरीफिकेशन करणे, ॲफिडेव्हिट देणे व त्या संदर्भातील सर्व ती कायदेशिर कामे करण्याबाबत फिर्यादी संस्थेचे मा. संचालक मंडळाने ठराव करून चंद्रकला मधुकर भांड यांना अधिकार दिलेले आहेत. तसा ठराव असुन त्याची प्रत सोबत दाखल केलेली आहे व त्या अधिकारात फिर्यादी संस्थेकरीता सदरची फिर्याद आणलेली आहे.

२) फिर्यादी संस्थेचे वतीने तीचे सभासदांना तसेच नाममात्र सभासदांना उद्योगधंदयासाठी, घर बांधकामासाठी, वाहन खरेदी, तसेच इतर घरगुती कारणासाठी कर्जपुरवठा केला जातो तसेच ठेवी गोळा करून बँकिंगचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला जातो.आरोपी यांनी फिर्यादी संस्थेकडुन व्यवसाय वाढीसाठी कर्जाउ रक्कम मिळावी म्हणुन कर्जाची मागणी केलेली होती. त्यानुसार आरोपीची कर्जाची मागणी मंजुर करून आरोपीस रक्कम रु. ३,००,०००/- चे कर्ज मंजुर करून कर्जप्रकरणातील अटी व शर्तीवर दि. २५/०६/२०२४ रोजी अदा करण्यात आलेले आहे. सदर कर्जाची रक्कम आरोपीने त्यावरील होणारे व्याजासहित मुदतीत फेड करण्याचे मान्य व कबुल केलेले होते. मात्र आरोपीने कबुल केल्याप्रमाणे सदर रक्कमेची फेड न करता कर्जाची बाकी थकविलेली आहे. अनेकवेळा मागणी करूनही रक्कम देऊ दिलाऊ करून दिलेली नाही. व रक्कम देण्याचे कामी टाळाटाळ केलेली आहे.

३) शेवटी आरोपीस थकबाकी रक्कमेची मागणी केली असता आरोपीने फिर्यादी संस्थेचे कार्यालयात येऊन आरोपीकडे असलेल्या थकबाकी रक्कमेचा हिशोब करून आरोपीकडे असणारे बाकी रक्कमेपोटी आरोपीने त्यांचे खाते असलेल्या ॲक्सीस बँक लि. शाखा, सावेडी, अहमदनगर या बँकेचा चेक नं.१२६३१२रक्कम रू. ३,०२,८७९/-

चा दि.२०/०१/२०२५ रोजीचा दिला व सदरचा खात्यात भरल्यानंतर निश्चीत वटेल अशी खात्री व भरवसा दिलेवरून आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवुन सदरचा चेक स्विकारला. सदरचा चेक फिर्यादी यांनी त्यांचे खाते असलेल्या दि अहमदनगर डि.से.को.ऑप बँक लि. शाखा सावेडी अहमदनगर या बँकेत दि. २०/०१/२०२५ रोजी भरला असता सदरचा चेक आरोपीचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने आरोपीचे बँकेने "फंडस इनसफिशियंट" असा शेरा मारून दि.२२/०१/२०२५ रोजी पाठविला व तशी इंटिमेशन फिर्यादीस त्यांचे बँकेने दिं. २४/०१/२०२५ रोजी देऊन चेक परत पाठविला आहे. सदरचा चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने आरोपीस वकिलामार्फत दि. २५/०१/२०२५ रोजी नोटीस पाठवुन चेक डिसऑनर झाल्याबाबत कळविले व चेकचे रक्कमेची मागणी केली असता सदरची नोटीस दि. २९/०१/२०२५ मिळुनही आरोपीने मुदतीत फिर्यादीस चेकची रक्कम आणुन दिलेली नाही.

अशाप्रकारे चेक देतांना आरोपीचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही याची माहीती व कल्पना आरोपीस असतांना देखील आरोपीने जाणीवपुर्वक सदरचा खोटा चेक देऊन फिर्यादीची फसवणुक केलेली आहे व निगोसिएबल इन्स्ट्रमेंट अॅक्टचे कलम १३८ नुसार गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे म्हणुन फिर्यादीची आरोपीविरूध्द निगोसिएबल इन्स्ट्रमेंट अॅक्टचे कलम १३८ नुसार सदरची फिर्याद आहे.

**तरी फिर्यादीची विनंती की–**

आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन तसेच दंड करण्यात यावा व दंडाचे रक्कमेतुन फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा ही विनंती.

Scanned with CamScanner

याकामी फिर्यादीतर्फे तुर्त साक्षीपुरावा खालीलप्रमाणे-

अ] **शाखाधिकारी,**

ॲक्सीस बँक लि. शाखा, सावेडी, अहमदनगर साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येतांना आरोपीचे खात्याबाबत तसेच आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेऊन साक्षीस हजर रहावे,

ब] **शाखाधिकारी,**

अहमदनगर डि.से.को.ऑप बँक लि. शाखा सावेडी, अहमदनगर साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येतांना आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेऊन साक्षीस हजर रहावे,

येणेप्रमाणे फिर्यादीतर्फे तुर्त साक्षीपुरावा असे जादा पुरावा लागल्यास तो देण्याची फिर्यादीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे फिर्यादी यांची फिर्याद असे.

अहमदनगर.

तारीख२८/०२/२०२५

**ॲडव्होकेट**
[एन.के.नरसाळे]

**फिर्यादी**

पूण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती
सह.पतसंस्था मर्या., भिस्तबाग, अहमदनगर

Scanned with CamScanner

**S.C.C.No.2393/2025**
**Punyashlok Ahilyadevi Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit, Ahmednagar**
**Vs**
**Mayuri Sagar Shinde**

## ORDER BELOW EXH.1

Read the complaint. Heard the learned counsel for the complainant. By virtue of Section 4(2) of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023, being special Act, the procedure prescribed under Section 142 of The Negotiable Instruments Act, 1881 i.e. taking cognizance of such offence on affidavit is applicable and not the proviso of Section 223(1) of The B.N.S.S., 2023 i.e. opportunity of hearing to the accused be given before taking the cognizance of offence. The complainant has submitted the affidavit. Perused the affidavit and documents on record. From the record, prima facie sufficient grounds appears for proceeding against the accused for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881. Resultantly, the following order :

## O R D E R

1. Issue process against the accused under Section 227 of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881.

2. Issue summons to the accused in regular mode as well as by R.P.A.D.

3. Hamdast be given to the complainant for service of summons, if required.

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
DN: cn=MAYA ABHIJEET DESHMUKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6953363, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN

( Maya A. Deshmukh )
Addl. Chief Judicial Magistrate,
(Court No.06) Ahmednagar

Date : 03.04.2025